# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प

## प्रकल्पांतर्गत नेमलेल्या सेवा पुरवठादार यांचेसाठी मार्गदर्शक सुचना (सामाजिक विकास)

### १. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प हा जागतिक बँक सहाय्यीत प्रकल्प असून महाराष्ट्र राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये तीन टप्प्यात राबविणेचा आहे. पहिल्या टप्प्यामध्ये राज्यातील १० जिल्हे दुसऱ्या टप्प्यामध्ये ११ जिल्हे व तिसऱ्या टप्प्यामध्ये १२ जिल्ह्यांचा समावेश केला जाईल. प्रकल्पाचा एकुण कालावधी सहा वर्षांचा आहे. सदर प्रकल्पामध्ये शेती व शेतीशी संलग्न क्षेत्रांमध्ये उत्पादकता वाढविणे, शेतमालाचा दर्जा सुधारणे व शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. अशी बाजारपेठ उपलब्ध झाल्यास शेतमालास चांगला भाव मिळू शकेल. शेतकऱ्यांचा बाजारपेठेतील सहभाग वाढविणेचे दृष्टिकोनातून सध्या अस्तित्वात असलेल्या बाजारपेठांमध्ये सुधारणा करणे त्याचबरोबर पर्यायी बाजारपेठा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जातील. शेतकऱ्यांची क्षमता बांधणी करणे व त्यानी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करावा यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, शैक्षणिक सहली व शेतीतील पथदर्शी प्रयोगांची उभारणी इ. उपक्रम हाती घेतले जातील.

### २. प्रकल्पाचे विकासात्मक उद्दीष्टः

राज्यातील शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविणे, त्यांचे निव्वळ उत्पन्न वाढविणे व त्यांचा बाजारपेठेतील सहभाग वाढविणे हे प्रकल्पाचे विकासात्मक उद्दीष्ट आहे.

### ३. संदर्भासाठीची कागदपत्रे/ अहवालः

प्रकल्पांतर्गत नेमणूक केलेल्या सेवा पुरवठादार संस्था किंवा सल्लागार यानी अधिक माहितीसाठी प्रकल्प अंमलबजावणी पुस्तिका (PIP) व त्याची परिशिष्टे, एकात्मिक पर्यावरण विषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA), लोकांसाठी प्रकल्प कार्यवाही मार्गदर्शिका व अन्य उपलब्ध मार्गर्शक पुस्तिकांचा वापर करावा.

### ४. एकात्मिक पर्यावरण विषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA) व पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF):

एकात्मिक पर्यावरण विषयक व सामाजिक मुल्यांकन अभ्यास अहवाल (IESA) मध्ये पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा दिलेला असुन तो प्रकल्प समन्वय कक्षासाठी दिशादर्शक आहे. त्यामुळे प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी व कार्यान्वयन या सर्व टप्प्यांमध्ये ESMF नुसार उपाययोजना करता येतील. ESMF सर्व उपप्रकल्पांना लागू असुन सेवा पुरवठादार सदर उपाययोजनांचा समावेश संपूर्ण प्रकल्प प्रस्तावामध्ये (FPP) करील.

### ५. IESA चे सर्वसाधारण मुल्यांकनः

सदरहू प्रकल्पामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या उपक्रमांचे पर्यावरण विषयक आणि सामाजिक मुल्यांकन सकारात्मक आहे. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर अनिष्ट परिणाम किंवा पर्यावरणाची हानी संभवत नाही. तसेच समाजातील मागास व दुर्लक्षित घटकांवर अनिष्ट परिणाम होणार नाहीत. किंबहुना या प्रकल्पामुळे पर्यावरण व सामाजिक या दोन्हीबाबतीत सकारात्मक परिणाम दिसून येतील. तरीसुध्दा असे परिणाम अभावाने देखील होऊ नयेत म्हणून या अहवालाचे निष्कर्ष व नमूद केलेल्या शिफारशी ध्यानात घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

### ६. सेवा पुरवठादारांनी ध्यानात ठेवावयाच्या मार्गदर्शक बाबी :

- बाधित कुटूंबाना नुकसान भरपाई प्रदान करण्यासंबंधी उपाययोजना निश्चित करण्यासाठी विस्थापना व पुनर्वसन संदर्भात मालकीहक्क संबंधाने तयार केलेली प्रस्तावित कार्यपध्दती
- महिलांना प्रकल्पाचे फायदे मिळावेत म्हणून तयार केलेली महिला विकास कार्यपध्दती.
- आदिवासी मोठ्या संख्येने असलेल्या भागामध्ये उपप्रकल्प घेत असताना आदिवासींच्या विकासाचे दृष्टीने तयार केलेली कार्यपध्दती.

- मृदा, सुक्ष्म अन्नद्रव्ये व उपद्रवी किडींचा बंदोबस्त यासंदर्भात तयार केलेली संयुक्त उपाययोजना ज्याद्वारे कमीतकमी निविष्टांमध्ये शेतीमध्ये जादा उत्पादन घेता येईल व पर्यावरणावरही अनिष्ट परिणाम होणार नाही.

- प्रकल्पांतर्गत काम करणारे अधिकारी, संलग्न शासकिय विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी, उत्पादक संघाचे सदस्य, प्रकल्पातील लाभार्थी तसेच महिला व आदिवासी यांच्या क्षमता बांधणीसाठी आयोजित करावयाचे प्रशिक्षण कार्यक्रम.

- प्रकल्पांतर्गत समाविष्ट संस्था, उप पकल्पांतर्गत नव्याने स्थापन होणाऱ्या संस्था यांच्यासाठी तयार केलेली समस्या निवारण यंत्रणा.

- प्रकल्पासाठीचे अंतर्गत व बाह्य संनियंत्रण व मुल्यमापन (पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखड्यातील उपक्रमासह)

- IESA अहवालातील निष्कर्ष व शिफारशी तसेच प्रकल्पाशी निगडीत महत्वाची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करणे.

(टिपः प्रकल्पातील उपक्रम राबवित असताना प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीचे दृष्टीने सेवा पुरवठादारांनी वर उल्लेख केलेल्या मार्गदर्शक बाबींचा अवलंब करावा)

**७. संपूर्ण प्रकल्प प्रस्तावांचे (FPP) सादरीकरण:**

FPP चे सादरीकरण करताना सेवा पुरवठादारानी संलग्न शासन विभागाचे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIUs) यांचा सल्ला घ्यावा. सविस्तर प्रकल्प प्रस्तावामध्ये आवश्यक त्या सर्व माहितीबरोबरच उप प्रकल्पामध्ये सहाय्य करावयाच्या बाबी व उपप्रकल्पाची व्याप्ती याची माहिती असावी.

**८. FPP ची चाळणी प्रक्रिया व संबंधीत फॉर्मसची पूर्तताः**

IESA अहवालाच्या प्रकरण सहामध्ये दिलेल्या तपशीलानुसार FPP चे सादरीकरण ते मंजुरी या विविध टप्प्यांमध्ये आवश्यक असलेल्या चाळणी प्रक्रियेचा अवलंब सेवा पुरवठादारांनी करावा व आवश्यक ते फॉर्मसही सादर करावेत. सदरचे फॉर्मस ES १, ES २, ES ३, ES ४, ES ५ या नमुण्यात दिले असून ते उप प्रकल्पाच्या पूर्व नियोजन, पूर्वतयारी, अंमलबजावणीपूर्व तयारी, प्रकल्प पूर्व-कार्यान्वयन व प्रकल्प कार्यान्वयन या विविध टप्प्यांसाठी आहेत.

**९. उपप्रकल्पांची अंमलबजावणी:**

सेवा पुरवठादारांनी करारपत्रात नमूद केल्यानुसार आवश्यक ती सर्व कामे व जबाबदाऱ्या विहीत वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच त्यानी उप प्रकल्प अंमलबजावणी करणारी संस्था, संलग्न शासन विभागाची कार्यालये, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष व प्रकल्प समन्वय कक्ष यांचेशी समन्वय ठेऊन काम करावे.

**१०. प्रकल्पातील पर्यावरण विषयक व सामाजिक बाबी:**

प्रकल्पामध्ये पर्यावरण विषयक व सामाजिक विकास या संदर्भात विपरीत परिणाम जरी होणार नसले तरीसुध्दा खालील बाबी ध्यानात घ्याव्यात.

**अ. पर्यावरण विषयक बाबी:**

- उपप्रकल्पातील बहुतेक कामे ही संबंधित संस्थांच्या मालकीच्या जागेवर होणार आहेत. परंतु या संदर्भात काही मुद्दा उपस्थित झाल्यास करावयाच्या उपाययोजना अहवालात दिलेल्या आहेत.

- नविन बाजार सुविधा निर्माण करताना उदाः शेतकरी सामुहिक सेवा केंद्राची इमारत, गोदामे इ. चे बांधकाम करताना ही ठिकाणे विशिष्ट शेतमाल उत्पादनाचे क्षेत्रापासून जवळ व पक्क्या रस्त्यानी जोडलेली असावीत.

- उप प्रकल्पासाठीची जमीन ही जंगल जमीन किंवा संरक्षित जमीन असू नये. प्रकल्पामध्ये अस्तित्वात असलेल्या बाजारपेठांमध्येच सुधारणा करावयाची असल्याने जमीन वापरामध्ये मोठा बदल, नविन जमिनीचे संपादन किंवा लोकवस्तीला कोणताही धोका संभवत नाही.

- बाजारपेठांमध्ये सुधारणा केल्यामुळे शेतमालाची विक्री वाढेल, त्याचबरोबर घनकचऱ्यामध्येही वाढ होईल म्हणून अहवालामध्ये घनकचरा व्यवस्थापन उपाययोजना सुचविली आहे.

- शेती पध्दतीमधील बदल व बाजारपेठांमधील वाढत्या संधींमुळे जादा उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांकडून रासायनिक खते व औषधे यांचा वापर वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी IESA अहवालामध्ये एकात्मिक मृदा, सुक्ष्म अन्नद्रव्ये व उपद्रवी किडींचा बंदोबस्त याबाबतची व्यवस्थापन पध्दती दिलेली आहे.
- पर्यावरण संवर्धनाचे दृष्टीने पर्यायी तसेच पर्यावरण पूरक बांधकाम साहित्याचा वापर उप प्रकल्पातील बांधकामांमध्ये करावा.

**ब. सामाजिक बाबी:**

- प्रकल्पांतील कामांमुळे लोकांचे विस्थापन किंवा त्यांचे पुनर्वसन अपेक्षित नाही. तरीदेखील एखादे काम हाती घेताना असा मुद्दा उपस्थित झालाच तर करावयाची उपाययोजना IESA अहवालामध्ये दिलेली आहे.
- प्रकल्पाच्या कामांमधून स्थानिक लोकांवर कोणताही अनिष्ट परिणाम होणार नाहीत. तरीसुध्दा अहवालामध्ये स्थानिक लोकांना विषेशतः आदिवासी, महिला व अन्य दुर्लक्षित घटकांना या प्रकल्पाचे लाभ मिळावेत म्हणून उपाययोजना सुचविलेली आहे.
- प्रकल्प अंमलबजावणीमुळे लाभार्थ्यींचे आरोग्य व शिक्षण या बाबतीत अप्रत्यक्षरित्या सुधारणा होईल असे अपेक्षित आहे.
- प्रकल्प अंमलबजावणीमुळे बाजारपेठांमधील विविध सुविधांमध्ये वाढ होऊन शेतकऱ्यांचा बाजारपेठांमधील सहभाग वाढेल.

(टिपः सेवा पुरवठादारानी FPP सादर करताना तसेच उपक्रमांची अंमलबजावणी करताना वरील बाबी ध्यानात घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी)

**११. आदिवासी, महिला व अन्य मागास घटकांचा प्रकल्पामधील सहभाग व लाभः**

- प्रकल्पाचा लाभ अन्य शेतकऱ्यांबरोबरच लहान व सिमांत शेतकरी तसेच भूमीहीन, आदिवासी व अन्य मागास घटकांनाही मिळणे अपेक्षित आहे. त्यासाठी सेवा पुरवठादार, संलग्न शासन विभाग यांनी त्यांचा उपप्रकल्पांमध्ये सहभाग मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. एखाद्या विकासात्मक प्रकल्पाचा लाभ गरीब, दुर्लक्षित घटकांना किती प्रमाणात मिळाला हे अत्यंत महत्वाचे असते. अधिक माहितीसाठी प्रकल्प अंमलबजावणी पुस्तिकेतील (PIP) पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन हे प्रकरण पाहावे.
- प्रकल्पातील अनेक उपक्रमांमध्ये लोक संघटन व लोक सहभाग आवश्यक आहे. लोक संघटन व लोक सहभाग ही एक प्रक्रिया असून या प्रक्रियेमध्ये सेवा पुरवठादार संस्थांनी वर उल्लेख केलेल्या घटकांना सहभागी करुन घ्यावे. त्याचबरोबर प्रकल्प अंमलबजावणी कक्षांनी सर्व उपक्रमांचे योग्य प्रकारे पर्यवेक्षण करुन अशा घटकांचा सहभाग होईल यासाठी प्रयत्न करावेत.
- प्रकल्पामध्ये महिलांचे सर्व प्रश्न जरी हाताळणे शक्य नसले तरी काही प्रश्न निश्चितपणे हाताळता येतील. महिलांसाठी असणाऱ्या शासकिय योजनांचा लाभ त्याना मिळवून दिल्यास त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. प्रकल्पामध्ये तयार केलेल्या स्त्री - पुरुष समानता कार्यपध्दतीमध्ये ज्या बाबी सुचविल्या आहेत त्या पुढीलप्रमाणेः बाजार आवारामध्ये महिलांसाठी विशेष सुविधा निर्माण करणे, स्वयंसहाय्यता गटांना प्रकल्पाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे तसेच त्यांना विविध बांधकामांमध्ये सहभागी करुन त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे, अंमलबजावणी संस्थांच्या विविध समित्यांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग मिळावा म्हणून प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे व या समित्यांच्या बैठकीमध्ये त्या सहभागी होतील याची खात्री करणे.
- प्रकल्पामध्ये तयार केलेल्या आदिवासी विकास कार्यपध्दतीचे उद्दिष्ट प्रकल्पाच्या विविध उपक्रमांमध्ये आदिवासींचा सहभाग वाढविणे व त्याना इतरांच्या बरोबरीने प्रकल्पाचा लाभ मिळवून देणे हा आहे. त्यासाठी प्रकल्पामध्ये उपलब्ध असणाऱ्या संधीबाबत त्यांच्यात जागृती करणे, प्रकल्पांतर्गत तयार करावयाचे विविध गट, संस्था (उदाः CIG, FIG, PA, FCSC, APMC) मध्ये त्यांचा समावेश करणे व सहभागी गट व संस्थांच्या निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग वाढविणे, त्यांच्यातील विविध कौशल्यांची वृध्दी करणे, आदिवासींचा बाजारपेठेतील सहभाग वाढविण्यासाठी काही

सवलती देणे या काही उपाययोजना सुचविल्या आहेत. CIG, FIG, PA असे गट व संस्था स्थापन करताना सुरुवातीलाच त्यांना सहभागी करुन घेतले पाहिजे.

- प्रकल्पांतर्गत शेती, पशुसंवर्धन संदर्भातील विविध पथदर्शी उपक्रम, पथदर्शी प्लॉटस, फळबाग लागवड इ. हाती घ्यावयाचे असून सेवा पुरवठादारांनी आदिवासी, महिला व अन्य वंचित घटक त्यामध्ये सहभागी होतील याची दक्षता घेतली पाहिजे.

- प्रकल्पांतर्गत काम करणारे संलग्न शासन विभागाचे कर्मचारी, लाभार्थी संस्था व वैयक्तिक लाभार्थी यांची प्रकल्पाच्या यशस्वितेमध्ये महत्वाची भूमिका आहे. त्यादृष्टीने त्यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, शैक्षणिक सहली इ. चे आयोजन करण्यात येईल. अशा कार्यक्रमांमध्ये आदिवासी, महिला व अन्य मागासलेल्या घटकांचा प्राधान्याने समावेश करण्यात यावा. सेवा पुरवठादार या संदर्भात महत्वाची भूमिका बजावू शकतात.

## १२. प्रकल्पांतर्गत पर्यावरण व सामाजिक विभाग (संस्थात्मक व्यवस्था)

पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन विषयक बाबींची कार्यवाही योग्य प्रकारे व्हावी यासाठी प्रकल्पांतर्गत स्थापन केलेल्या प्रकल्प समन्वय कक्ष यांनी यथोचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. या प्रकल्पासाठी प्रकल्प समन्वय कक्ष च्या अखत्यारीत वेगळा पर्यावरण व सामाजिक विभाग सुरु करण्यात आला आहे. या विभागामध्ये एक सामाजिक विशेषज्ञ आणि एक पर्यावरण विशेषज्ञ राहतील आणि ते संलग्न प्रकल्प अंमलबजावणी कक्षांच्या संपर्कात राहून काम करतील व आवश्यक ते संनियंत्रण करतील. तसेच तीन संलग्न प्रकल्प अंमलबजावणी कक्षांमध्ये पर्यावरण व सामाजिक विषयक काम पाहाण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. हे अधिकारी उप-प्रकल्प स्तरावरील जन-जागृती, लोक संघटन व पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन विषयक बाबी व या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक या महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडतील. तसेच प्रकल्पांतील उप प्रकल्पांमध्ये सेवा पुरवठादार संस्थांचा सहभाग घेतला जाणार असून जन-जागृती, लोक संघटन इ. साठी व विशेषतः अंमलबजावणीमध्ये महिला, आदिवासी, अनुसूचित जाती जमाती व अन्य दुर्बल घटकांचा सहभाग व त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी त्यांचे सहकार्य घेण्यात येईल.

S / D<br>
(व्ही. व्ही. वैद्य)<br>
प्रकल्प संचालक<br>
महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प

दि. २१/०१/२०११

**टिप:**

१. सदरच्या **सामाजिक विकास** मार्गदर्शक सुचनांना मा. प्रकल्प संचालक यांनी मंजूरी दिलेली आहे. पर्यावरण व्यवस्थापन विषयक मार्गदर्शक सुचना पर्यावरण तज्ञ, पीसीयु यांनी स्वतंत्रपणे तयार केलेल्या आहेत.
२. नोडल अधिकारी- प्रअंक, कृषी, कृषी पणन व पशुसंवर्धन यांना सदरच्या मार्गदर्शक सुचना माहितीस्तव सादर.
३. प्रअंक, कृषी, कृषी पणन व पशुसंवर्धन अंतर्गत नेमणूक करावयाच्या सेवा पुरवठादारांसाठी मा. प्रकल्प संचालक यांच्या सहीनिशी स्वतंत्रपणे सदरच्या मार्गदर्शक सुचना देता येतील.

***